३० व्या **'महाराष्ट्र राज्य पोलीस क्रिडा स्पर्धा २०१८'** नुकत्याच नवी मुंबई येथे दि ०६/०१/२०१८ ते ११/०१/२०१८ संपन्न झाल्या. सदर क्रिडा स्पर्धेमध्ये सिंधुदुर्ग जिहयाने उज्ज्वल व अभुतपुर्व असे यश मिळवले. या जिल्हयाच्या नेमणुकीतील पोलीस कॉन्स्टेबल राहुल काळे याने कोकण परीक्षेत्राकडुन सदर स्पर्धेमध्ये सहभागी होताना १०० मीटर व २०० मीटर धावणे तसेच सांघिक ४ X १०० मीटर रीले या क्रिडाप्रकारात प्रत्येकी 'सुवर्ण पदक'(एकुण ०३ सुवर्ण पदके ) पटकाविलेले आहेत. त्यामध्ये त्यांने महाराष्ट्र राज्यातील पोलीसांचा यापुर्वीचा २०० मीटर धावणे चा २१.८० सेकंद असा असलेला रेकॉर्ड मोडीत काढुन २१.७० सेकंद असा नवीन रेकॉर्ड केलेला आहे. याशिवाय त्याने १०० मीटर धावणे मध्ये १०.९७ सेकंद अशी वेळ नोंदवुन सुवर्ण पदक प्राप्त केलेले आहे तसेच ४ X १०० मीटर रीले मध्ये कोकण परीक्षेत्रासाठी सुवर्ण पदक मिळवुन देण्यास त्याचा सिंहाचा वाटा राहीलेला आहे. तसेच या स्पर्धेतील **उत्कृष्ठ खेळाडु** चे गव्हर्नर शिल्ड व बक्षीस म्हणुन महाराष्ट्र राज्य पोलीस क्रिडा स्पर्धा आयोजकांकडुन देण्यात येणारी होंडा ड्रिम युगा मोटर सायकल मा. श्री. विदयासागर राव महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या हस्ते देवुन गौरविण्यात आलेले आहे. या त्यांच्या उल्लेखनीय कामगीरीसाठी पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग यांनी ९०००/- रु असे बक्षीस देवुन गौरविलेले आहे.

सदर कर्मचारी यांनी पुर्वीही **अखिल भारतीय पोलीस क्रिडा स्पर्धा २०१७** डेहराडुन उत्तराखंड येथे दि २६/१२/२०१७ ते ३१/१२/२०१७ या मुदतीत संपन्न झालेल्या ॲथलॅटिक्स मैदानी क्रिडा स्पर्धा मध्ये २०० मीटर धावणे या क्रिडाप्रकारात कांस पदक व ४ X १०० मीटर रीले या त्याच्या उल्लेखनीय कामगीरीसाठी श्री. दीक्षीत कुमार गेडाम. पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग यांनी रौप्य पदक साठी ५०००/-रु कांस्य पदक साठी ४०००/- रु असे बक्षीस देवुन गौरविलेले आहे.

तसेच **'महाराष्ट्र राज्य पोलीस क्रिडा स्पर्धा २०१८'** मध्ये, हॅण्डबॉल या सांघिक क्रिडा प्रकारात पोलीस कॉन्स्टेंबल रोहीत आईर बक्कल नं ७६२ नेमणुक पोलीस मुख्यालय ओरोस व पोलीस कॉन्स्टेंबल बसवराज कुंदगोळ बक्कल नं.९५९ नेमणुक कणकवली पोलीस ठाणे यांनी उत्कृष्ठ कामगीरी करुन सुवर्ण पदक पटकाविलेले आहे.त्यांच्या या कामगीरी करीता पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग यांनी प्रत्येकी २०००/- रु बक्षीस दिलेले आहे. तसेच महीला पोलीस कॉन्स्टेंबल भक्ती शिवलकर बक्कल नं.१३३ नेमणुक मालवण पोलीस ठाणे हिने खो-खो मध्ये उत्कृष्ठ कामगीरी करुन रौप्य पदक पटकाविलेले आहे. त्यांच्या या कामगीरी करीता पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग यांनी १०००/- रु बक्षीस दिलेले आहे.

सिंधुदुर्ग जिहयामध्ये नैसर्गिक कौशल्याची कमतरता नाही. त्यांच्या या कौशल्याला चालना देण्यासाठी व त्यांच्यातील सुप्त गुणांना उजाळा देण्यासाठी मा.श्री. दीक्षीत कुमार गेडाम पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग यांनी खेळाडुंसाठी १,२२,०००/- रु रकमेचे क्रिडा साहित्य उपलब्ध करुन दिलेले आहे. तसेच यापुढेही सिंधुदुर्ग जिल्हयातील पोलीसांनी येत्या कोकण परीक्षेत्रीय क्रिडास्पर्धामध्ये व महाराष्ट्र राज्य पोलीस क्रिडा स्पर्धेत यश मिळवावे यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार असल्याचे यावेळी अपर पोलीस अधीक्षक यांनी सांगितले.

दि १६/०१/२०१८ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालयय येथे सदर खेळाडुंचा व राहुल काळे यांच्या माता-पिता यांना बोलावुन मा. श्री. प्रकाश गायकवाड अपर पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग, यांच्याहस्ते त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.